लॉरा इनगल्स वाइलडर



जिन्जर वैडसवर्थ, चित्र: शैली

मराठी: अश्विनी बर्वे

लॉरा इनगलस वाइलडर



जिन्जर वैडसवर्थ

चित्र: शैली

मराठी: अश्विनी बर्वे



मिनसोटा
१८७४


सात वर्षांची लॉरा पटकन कॅनव्हासने झाकलेल्या गाडीत चढली. तिची मोठी बहीण, मेरी, तिच्या शेजारी बसली होती. तिची लहान बहीण, कॅरी, आईच्या मांडीवर होती. वडिलांनी लगाम हातात घेतला आणि घोडे पुढे जाऊ लागले. ती गाडी धुळीच्या रस्त्यावरून पुढे सरकली.



दिवसेंदिवस, त्यांची गाडीपश्चिमेकडे अधिक पुढे सरकत होती. आईचे मोठे स्वयंपाकाचे भांडेगाडीवर पुन्हा पुन्हा आदळत होते. गाडीचे कापडी छप्पर वाऱ्याने फडफडत होते. मेरी, लॉरा आणि कॅरी गाडीच्या आत आपल्या बाहुल्यांशी खेळत होत्या.



त्यांचा कुत्रा, जॅक, गाडीच्या मागे चालत होता. लॉराला गाडीतून बाहेर बघायला खूप आवडायचे. त्या विस्तीर्ण गवताळ प्रदेशावरचे आकाश एखाद्या निळ्या वाटीसारखे पसरले होते.





रात्री, इंगल्स कुटुंब एका लहान नदीजवळ थांबायचे. आई आग पेटवून मांस आणि भाज्या शिजवायची. जेवण झाल्यावर, लॉरा ताटं आणि कप स्वच्छ करून जागेवर ठेवायची. वडील आपली रायफल जवळच ठेवत असत. जर एखादा लांडगा त्यांच्या छावणीजवळ आला, तर ते तिचा वापर करायचे.जेव्हा ते आगीभोवती बसायचे, तेव्हा वडील व्हायोलिन वाजवायचे आणि ते सर्वजण एकत्र गाणी म्हणायचे.

लॉरा तिच्या वडिलांना गोष्ट सांगायला सांगायची. ते आपली विस्कटलेली दाढी खाजवायचे. लॉराला वाटले की ते तिला एका महाकाय अस्वलाची गोष्ट सांगतील. पण त्यांनी तिला तिच्या आजोबांची आणि एका बिबट्याची गोष्ट सांगायला सुरुवात केली. ती एक भीतीदायक गोष्ट होती, त्यामुळे ती लॉराच्या आवडत्या गोष्टींपैकी एक होती. जेव्हा जेव्हा तिचे वडील तिला ही गोष्ट सांगायचे, तेव्हा ती भीतीने थरथर कापायची.



लॉराला तिच्या वडिलांच्या गोष्टी खूप आवडायच्या. तिने त्या अनेकदा ऐकल्या होत्या. कदाचित आज ती स्वतः गोष्टीचा शेवटचा भाग सांगू शकेल. शेवटी, नेहमीप्रमाणे, आजोबा बिबट्यापासून सुटणार होते. तिच्या वडिलांप्रमाणेच, लॉरा एक उत्तम गोष्ट सांगणारी होती.





डकोटा
१८८०

लॉराने झोपडीतून डोकावून पाहिले. बाहेर, शेतातील गवत वाऱ्यासोबत नाचत असल्यासारखे वाटत होते. लॉराने तिची घरची कामे पटकन उरकली. ती मेरीसोबत ज्या पलंगावर झोपायची, त्यावरची रजई तिने व्यवस्थित केली. मग तिने कॅरी आणि लहानगी ग्रेस यांच्यासाठी नाश्ता तयार केला. तिने फाटलेली चादर शिवली. पण तिला शिवणकामाचा तिरस्कार होता.



शेवटी, सगळी घरकामं झाली. लॉरा घाईघाईने घरातून बाहेर पडली. ती गवतावर अनवाणी धावली.तिने आपली उन्हाळी टोपी काढली. तिला तिच्या चेहऱ्यावर सूर्याची ऊब जाणवली. तिला आशा होती की तिच्या अशा वागण्याबद्दल तिची आई तिला ओरडणार नाही.





ती तिची गाय, एलेनला, जिथे ताजे गवत होते तिथे घेऊन आली. मग तिने तिच्या वडिलांना गवत कापायला मदत केली. त्या दोघांनी गवत वाळवण्यासाठी जमिनीवर पसरवले. त्यांनी वाळलेल्या गवताच्या पेंढ्या बनवल्या. त्यांनी त्या पेंढ्या घेतल्या आणि कोठारात आणल्या.

हा चारा हिवाळ्यात गाईंना खाऊ घालण्यासाठी उपयोगी पडेल. लॉरा फार उंच नव्हती, पण ती मजबूत होती. तिला शेतातील कठीण कामात वडिलांना मदत करायला खूप आवडायचे.



शेवटी, लॉराने मोठी घागर पाण्याने भरली आणि ती घरात नेली. मेरी साफसफाई करताना गाणे म्हणत होती. मेरीला आता दिसत नाही हे लॉराला विसरणे सोपे होते.





लॉरा आणि मेरी यांनी डोक्यावर टोप्या घातल्या आणि गवताळ प्रदेशातून, एका जुन्या म्हशींच्या वाटेवरून, हातात हात घालून चालू लागल्या. मेरी धैर्याने आपल्या अंधत्वाला सामोरे जात होती. लॉरासुद्धा तसेच करत होती. तिने आपल्या वडिलांना आश्वासन दिले होते की ती मेरीचे डोळे बनेल.

लॉराने तिला दिसलेली प्रत्येक गोष्ट मेरीला सांगितली. चालताना, लॉराने कुरणावर गालिच्यासारख्या पसरलेल्या गुलाबी फुलांचे वर्णन केले. ढग निळ्या आकाशात जंगली घोड्यांप्रमाणे धावत होते. लॉराने आपल्या शब्दांनी प्रत्येक गोष्टीचे चित्र रेखाटले.



लॉरा जे काही वर्णन करायची, मेरी ते तिच्या मनात चित्ररूपात साकारायची. तिने लॉराला सांगितले की, मोठी झाल्यावर तिने एक पुस्तक लिहावे. लॉरा हसली. तिला गोष्टी रचायला खूप आवडायचे, पण पुस्तक लिहिणे? ती गोष्टी लिहू शकेल का?




एक दिवस, मेरी म्हणाली, गवताळ प्रदेश घरांनी भरून जाईल, शहरे उभी राहतील. म्हशींच्या पावलांच्या जागी मैदानी प्रदेशावर रस्ते तयार होतील. मेरीने लॉराला तिच्या वडिलांनी सांगितलेल्या गोष्टी लिहून ठेवायला सांगितले. लॉरा पुन्हा हसली, इंगल्स कुटुंबाबद्दलच्या गोष्टी कोणाला ऐकायला आवडतील?





दक्षिण डकोटाहून मिस्सुरी
१८८० आणि १८९०चे 1880 दशक

लॉरा १८ वर्षांची झाल्यावर तिने अल्मान्झो वाइल्डरशी लग्न केले. त्याच्या मालकीचे गव्हाचे मोठे शेत होते. शेतकऱ्याची पत्नी म्हणून लॉराला खूप कष्ट करावे लागत होते, पण ती आनंदी होती. लॉराला एक मुलगी झाली, जिचे नाव तिने आणि अल्मान्झोने रोझ ठेवले.



लॉराने अल्मान्झोला गहू लावायला मदत केली. लवकरच, जमिनीतून छोटे कोंब बाहेर येऊ लागले.थोड्याच वेळात, ही रोपे वाढली आणि वाऱ्याने डोलू लागली. गहू पिकण्यासाठी त्याला सूर्यप्रकाशाची गरज असते. पण त्या वर्षी, गारपिटीने संपूर्ण पीक नष्ट केले.



पुढच्या उन्हाळ्यात, कुरणे उष्ण आणि कोरडी होती. हवा लॉराच्या भट्टीसारखी गरम होती. पाऊस न पडल्याने, गव्हाची रोपे तपकिरी झाली आणि नंतर शेतातच सुकून गेली.






लॉरा आणि अल्मान्झो यांनी मिसूरीला स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतला. त्यांना आपले आयुष्य नव्याने सुरू करायचे होते. त्यांनी आपले कपडे, अंथरूण-पांघरूण आणि भांडी एका गाडीत भरली.सात वर्षांची रोझसुद्धा त्या गाडीत बसली. लॉराने तिच्या आई-वडिलांना आणि बहिणींना मिठी मारली आणि निरोप घेतला. सर्वांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. त्यांनी एकमेकांना पत्रे लिहिण्याचे वचन दिले.

पुढच्या वर्षी, टोळधाडीने गव्हाची रोपे नष्ट केली. कीटकांनी बागेतील सर्व भाज्या खाऊन टाकल्या. मग, लॉरा आणि अल्मान्झोच्या घराला आग लागली. पण लॉराने या संकटांचा धैर्याने सामना केला.





दोन घोडे एका धुळीच्या रस्त्यावरून एक झाकलेली गाडी ओढत होते. प्रवास लांबचा होता.वेळ घालवण्यासाठी, लॉरा आणि अल्मान्झो गाणी गात असत. दररोज, ती तिच्या आईला गोष्टी सांगायला सांगायची. लॉरा तिला गोष्टी सांगायची. तिने छोटी ग्रेस शेतातील उंच गवतात हरवल्याची गोष्ट सांगितली. लॉराने विस्कॉन्सिनच्या मोठ्या जंगलात ख्रिसमस साजरा केल्याची गोष्ट सांगितली.






जेवणानंतर, लॉरा शेकोटीजवळ बसायची, तिची वही आणि पेन्सिल बाहेर काढायची, आणि तिच्या प्रवासाचे वर्णन लिहायची. ती तिने पाहिलेल्या शेतांबद्दल लिहायची.



तिने त्या विस्तीर्ण गवताळ प्रदेशातून एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे जाणाऱ्या बंद गाड्यांबद्दल लिहिले. शोधासाठी निघालेले इतर लोकही नवीन शेतांच्या शोधात होते.


४५ दिवसांच्या प्रवासानंतर, वाइल्डर कुटुंब मिसूरीमधील मॅन्सफिल्ड येथे पोहोचले. तिथे त्यांनी शहराच्या जवळच्या एका जंगलात तळ ठोकला. त्यानंतर ते विकत घेण्यासाठी एका लहान शेताच्या शोधात निघाले. त्या शेतावर झाडांनी आच्छादलेल्या टेकड्या होत्या. सर्वत्र खडक होते. लॉराने तिच्या शेताला 'रॉकी रिज' असे नाव दिले. ते तिथे एका खोलीत स्थायिक झाले. लॉराने खोलीमधील कोळी, विखुरलेली पाने आणि उंदरांची घरटी साफ केली. तिने तिच्या वह्या सुरक्षित ठेवण्यासाठी एका खोक्यात ठेवल्या. एके दिवशी ती तिच्या नवीन आयुष्याबद्दल लिहिणार होती.



लॉरा आणि अल्मान्झो यांनी एक संघ म्हणून एकत्र काम केले. त्यांनी काही झाडे तोडली. अल्मान्झोने ते लाकूड एका गाडीत भरले आणि शहरात ७५ सेंटला विकले.



लॉराने काही अंडी आणि रानमेव्याची एक टोपली दहा सेंटला विकली. इतके पैसे तिच्याकडे येऊन खूप काळ लोटला होता. काम करताना ती आनंदाने शिट्टी वाजवत होती.





सॅन फ्रँस्सिको
१९१५

जेव्हा लॉरा ४८ वर्षांची होती, तेव्हा ती मिसूरीहून कॅलिफोर्नियातील सॅन फ्रान्सिस्कोला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसली. ती आपली मुलगी रोझला भेटायला उत्सुक होती. ती आता प्रौढ झाली होती आणि एक लेखिका बनली होती.



लॉरा अजूनही एका शेतकऱ्याची पत्नी होती. पण ती वर्तमानपत्रांसाठी कथाही लिहायची. कॅलिफोर्नियाला जाणारी रेल्वेगाडी खूप वेगाने धावत होती. अनेक वर्षांपूर्वी, बंद डब्यातून पश्चिमेकडे केलेल्या प्रवासाची आठवण लॉराच्या मनात आली. त्या डब्याला गवताळ प्रदेश ओलांडायला अनेक आठवडे लागले होते. पण रेल्वेने कॅलिफोर्नियाला पोहोचायला फक्त काही दिवस लागले.

लॉरा आणि रोझ पॅसिफिक महासागराच्या पाण्यातून सावकाश चालत होत्या. त्या रेडवुड वृक्षांच्या वनराईतून भटकल्या. त्यांनी उंच टेकड्यांवरून ट्राममधून प्रवास केला. सॅन फ्रान्सिस्को एक सुंदर शहर होते. पण लाराला अल्मान्झोची आठवण येत होती. ती त्याला जवळजवळ रोज पत्र लिहीत असे.



लारोने तिला जसे दिसले तसे सर्वकाही तंतोतंत वर्णन करण्याचा प्रयत्न केला. तिने तिच्या लहानशा लाल गाडीतील रोजच्या प्रवासाचे वर्णन केले. तिने समुद्रावरचा सूर्यास्त पाहण्याचे वर्णन केले. अल्मान्झोने लाराचे प्रत्येक पत्र एका दोऱ्याने एकत्र बांधून एका पेटीत ठेवली.





रॉकी रिज फार्म
१९३०चे दशक

लाराला कळायच्या आतच, ती साठ वर्षांची झाली होती. तिचे केस पांढरे झाले होते, पण तिला म्हातारं झाल्यासारखं वाटत नव्हतं. तिच्या व्यस्त वेळापत्रकातही, तिला तिच्या सुरुवातीच्या दिवसांबद्दल लिहायचं होतं. लाराने ब्रेड भाजायला ओव्हनमध्ये ठेवला आणिमग ती तिच्या डेस्कवर जाऊन बसली. कुठून सुरुवात करावी? तिने विचार केला. बिग वूड्समधून? प्लम क्रीकमधून? डकोटामधून?



लाराला तिच्या वडिलांची आणि त्यांच्या हास्याची आठवण झाली. तिला तिच्या शांत आणि प्रेमळ आईची उणीव भासत होती. ती उत्तम गोष्टी सांगू शकत होती, पण तिने आपल्या बालपणीच्या गोष्टी कधीच लिहून काढण्याचा प्रयत्न केला नव्हता. लाराने एक पेन्सिल उचलली आणि 'बिग वूड्स'बद्दल लिहायला सुरुवात केली.


लाराने त्या दोन भलेमोठमोठ्या ओक वृक्षांचा विचार केला, ज्यांच्या सावलीने त्यांचे घर झाकले होते. त्या झाडांखाली, मेरी आणि ती अनेकदा बाहुल्यांसोबत चहा-पार्टी खेळल्या होत्या. घराच्या आजूबाजूला आणि जिथपर्यंत नजर जाईल तिथपर्यंत झाडे होती. ज्या कुऱ्हाडीने तिचे वडील झाडे तोडत असत, तिचा आवाज लाराला ऐकू येत होता. लाराने इतर लहान घरांबद्दल लिहिले. एक घर एका लहान नदीजवळ होते. दुसरे घर एका सरोवराच्या काठावर होते. लॉरा अजूनही घरातील सर्व कामे स्वतःच करत असे आणि अल्मान्झोला शेतातही मदत करत असे. पण जेव्हा कधी तिला वेळ मिळायचा, तेव्हा ती लिहायला बसायची. कधीकधी, मध्यरात्री तिला एखादी गोष्ट आठवायची. ती पटकन उठून आपल्या डेस्कवर बसायची आणि लगेच लिहायला सुरुवात करायची





कथा पूर्ण झाल्यावर,ती ती रोझला टपालाने पाठवायची. रोझ त्या कथा एका प्रकाशकाकडे पाठवायची. प्रकाशकाला कथा आवडल्या. पण त्याला त्यात काही बदल हवे होते. लॉरा पुन्हा तिच्या डेस्कवर बसली. यावेळी तिने तिच्या घराच्या आठवणींबद्‌दल लिहिले.

“एके काळी, साठ वर्षांपूर्वी, विस्कॉन्सिनमधील बिग वूड्‌समध्ये एका लहान लाकडी घरात एक मुलगी राहत होती.”



जेव्हा लॉरा यांचे 'अ लिटल हाऊस इन द बिग वूड्स' हे पुस्तक प्रकाशित झाले, तेव्हा त्या पासष्ट वर्षांच्या होत्या. त्यांनी प्रसिद्ध होण्याचे स्वप्न कधीच पाहिले नव्हते. पण त्यांना आशा होती की काही मुले 'बिग वूड्स'मधील त्यांच्या साहसांबद्दल वाचतील





अनेक मुलांना तिचे पुस्तक खूप आवडले. संपूर्ण अमेरिकेतून वाचकांनी लाराला पत्रे लिहिली. पुढे काय होणार हे जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांना तिच्या वडिलांविषयी, तिच्या आईविषयी, मेरी, लॉरा, कॅरी आणि ग्रेस यांच्याविषयी जाणून घ्यायचे होते. त्यांना अल्मान्झोबद्दलही जाणून घ्यायचे होते.

कथा लिहिण्यासाठी लारो पुन्हा तिच्या डेस्कवर बसली. या नवीन कथेत आणि पुढच्या कथांमध्ये काय लिहायचं आहे हे तिला माहीत होतं. प्रत्येक कथा एका नवीन घराविषयी असणार होती.ती अनेक घरांमध्ये राहिली होती. लाराने पुन्हा तिची पेन्सिल उचलली.



लॉरा इनग्लस वाइलडर



लॉरा यांनी सात पुस्तके लिहिली. त्या अल्मान्झोसोबत आपल्या शेतावर आनंदाने राहत होत्या. दररोज, आपला कुत्रा ओल्ड बेन याच्यासोबत, त्या आपली टपाल घेण्यासाठी अर्धा मैल चालत पोस्ट ऑफिसला जात असत. त्या आपल्या वाचकांच्या पत्रांनी भरलेली टोपली घेऊन घरी परतत असत. त्यातील बहुतेक पत्रे त्यांची पुस्तके वाचलेल्या मुलांची होती. लॉरा प्रत्येक पत्राला उत्तर देत असत. लारो यांचे १९५७ मध्ये वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. पण लोक त्यांना विसरू शकत नाहीत. त्यांची घरे संग्रहालये म्हणून जतन केली आहेत. लॉरा यांच्या सुरुवातीच्या साहसांच्या कथा आजही लाखो मुले मोठ्या आवडीने वाचतात.